# Washim District Police

**Nature of Work** :- **Recovery of Stolen Property & Arrest Accused**

**Police Station** :- **Risod**

**Date of Good Work done** :- **05/02/2022**

**Brief of the work done :-**

पो.स्टे.रिसोड येथील घटना: १० हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल लंपास केल्याने तिन महिलांना अटक, महिलांनी बुरखा घालून केली होती चोरी.

लोकमत

## महिलांनी बुरखा घालून केली चोरी; तिघींना अटक

### रिसोड येथील घटना: १० हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल लंपास

लोकमत न्यूज नेटवर्क

**रिसोड :** कपड्याच्या दुकानात बुरखा घालून चोरी करीत परत जात असताना तीन महिलांना दुकानदाराने पकडून पोलिसांच्या स्वाधीन केले. तिघींनाही अटक करण्यात आली असून, गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

प्राप्त माहितीनुसार, दूरदर्शन केंद्रासमोर सचिन रमेश पायघन यांचे कपडा विक्रीचे दुकान आहे. ३ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ६.३० वाजण्याच्या समारास दुकानात तीन महिला काळ्या रंगाचा बुरखा घालून दुकानात शिरल्या. त्यांनी जीन्स पॅन्ट व शर्ट पाहून एक जीन्स पॅन्ट व शर्ट पसंद केले. हजार रुपयांत कपडे मागितले असता, दुकानदाराने देण्यास नकार दिला. त्यामुळे तिघी दुकानातून बाहेर पडल्या. मात्र, दुकानदारास संशय आल्याने त्यांनी तत्काळ दुकानातील सीसीटीव्ही फुटेज चेक करून पाहिले असता, संबंधित महिलांनी नजर चुकवून दुकानातील १० हजार ५०० रुपयांचा माल चोरी केल्याचे आढळून आले. त्यानंतर, अन्य मित्रांसोबत सचिन पायघन यांनी चोरट्या महिलांचा शोध घेतला व त्यांना पकडून पोलिसांच्या स्वाधीन केले.

रिसोड पोलिसांनी तिन्ही महिलांना अटक केली असून, गुन्हा दाखल करण्यात आला आहे. चोरट्या महिला या अकोला येथील रहिवासी आहेत. मेहरा अंजुम मोहम्मद महरूम (३५), आशिया बी. शेख लुकमार (४०) आणि शबाना परविन अबुसार (३२) अशी त्यांची नावे आहेत. प्रकरणाचा पुढील तपास रिसोड पोलिसांकडून करण्यात येत आहे.

Hello Washim
Page No. 1 Feb 05, 2022
Powered by: erelego.com